(१)

# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची 72 वी सभा शनिवार दिनांक 29.3.1997 रोजी सायंकाळी 5.00 वाजता प्राधिकरणाचे अध्यक्ष तथा मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता, यांचे अध्यक्षतेखाली त्यांचे दालनात मंत्रालय, मुंबई येथे संपन्न झाली. सदर सभेस प्राधिकरणाचे खालील सदस्य उपस्थित होते.

1) मा.ना.अण्णासाहेब डांगे.
   अध्यक्ष, महा. जीवन प्राधिकरण,
   व मंत्री, पा. पु. व स्वच्छता मंत्रालय, मुंबई.
2) श्री. राजेंद्र सगणे
   सदस्य सचिव, महा.जीवन प्राधिकरण,
   एक्सप्रेस टॉवर्स, मुंबई-21.
3) श्री.गोपालचंद्र त्रिपाठी.
   सचिव (व्यय), वित्त विभाग,
   श्री.वेंकटचारी, सदस्य, महा. जीवन प्राधिकरण,व
   अपर मुख्य सचिव वित्त विभाग, मंत्रालय यांचे प्रतिनिधी.
4) श्री.बा.या.माने.
   विशेष कार्य अधिकारी पा.पु. व स्वच्छता विभाग,
   श्री.टी.रंगनाथन, सदस्य महा. जीवन प्राधिकरण व
   प्रधान सचिव, पा.पु. व स्वच्छता विभाग यांचे प्रतिनिधी.

प्राधिकरणाच्या सभेस उपस्थित राहू न शकलेल्या सदस्यांच्या रजेस मंजूरी देण्यांत आली.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे खालील अधिकारी विशेष निमंत्रित म्हणून उपस्थित होते.

1) श्री.शे.दा.अरगाळ, मुख्य अभियंता, (कोकण विभाग)
2) श्री.मा.वि.दोमकोंडवार, मुख्य अभियंता (औरंगाबाद विभाग).
3) श्री.नि.कृ.माळी, मुख्य प्रशासकीय अधिकारी.
4) श्री.भा.आ.डोंगरे, वित्तीय सल्लागार व मुख्य लेखाधिकारी.

प्राधिकरणाचे सदस्य सचिव श्री.राजेंद्र सगणे यांनी प्रथम माननीय नामदार श्री.अण्णासाहेब डांगे, अध्यक्ष महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व उपस्थित सदस्यांचे स्वागत केले. नंतर सभेच्या कामकाजास सुरुवात केली.

## कार्यक्रम बाब क्र.1 : 70 व्या सभेतील बाबींवर करण्यांत आलेली कृती.

प्राधिकरणाच्या 70 व्या सभेतील कार्यक्रम बाबींवरील केलेली कृती, सदस्य सचिवांनी वाचून दाखविली त्यावर कोणत्याही सूचना न आल्याने 70 व्या सभेतील सर्व बाबींवरील कृती सभेत मान्य करण्यांत आल्या.

## कार्यक्रम बाब क्र.2 :— सुधारित अंदाजपत्रक 1996—97 व अंदाजपत्रक 1997—98.

सदर कार्यक्रम बाब प्राधिकरणाचे वित्तीय सल्लागार व मुख्य लेखाधिकारी यांनी सभेपुढे सादर करताना 1996-97 च्या सुधारित अंदाजपत्रकातील महसुली मिळकत व महसुली खर्च मूळ व सुधारित अंदाजपत्रकातील फरकाची कारणे तसेच भांडवली मिळकत व भांडवली खर्च याबाबत सभेस विस्तृत माहिती सांख्यिकी स्वरूपात विशद केली. 1997-98 मधील महसुली मिळकत व महसुली खर्च तसेच भांडवली मिळकत व भांडवली खर्च याबाबतही सांख्यिकी स्वरूपात सभेपुढे माहिती सादर केली. यावर सभेमध्ये महसुल मिळकत, महसुल खर्च तसेच भांडवल मिळकत व भांडवली खर्च यावर चर्चा होऊन सर्वानुमते सदर अंदाजपत्रकास मान्यता देण्यात येऊन खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

ठराव :

असा ठराव करण्यात येतो की, मंडळाच्या सन 1996-97 चा सुधारित व 1997-98 चा अंदाजित महसुली व भांडवली आयव्यय खालीलप्रमाणे मान्य करीत आहे.

(रुपये लाखात)

| अ.क्र. | तपशिल. | सन 96-97 चे सुधारीत अंदाजपत्रक. | सन 97-98 चे अंदाजपत्रक. |
|---|---|---|---|
| 1. | महसुली मिळकत. | 24427.00 | 28666.55 |
| 2. | महसुली खर्च. | 23295.03 | 27766.00 |
| 3. | भांडवली मिळकत. | 50642.91 | 88286.55 |
| 4. | भांडवली खर्च. | 50642.91 | 88286.55 |

प्राधिकरण असे सूचित करीत आहे की, सन 1996-97 च्या सुधारित व सन 1997-98 च्या अंदाजपत्रकातील तरतूदीमधून खर्च करतांना महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनि:सारण मंडळ कायदा, 1976 मधील कलम क्रमांक 34 (1) च्या तरतूदी लक्षात घ्याव्यात.

## कार्यक्रम बाब क्र.3 : पूरजल योगतालच्या 20 गावांची प्रादेशिक ग्रामीण नळ पाणी पुरवठा योजना ता. वसमत व औंढा, जिल्हा- परभणी

सदर कार्यक्रम बाब मंडळाचे सदस्य सचिव यांनी सभेपुढे सविस्तररित्या मांडली. योजनेबाबत मागविण्यात आलेल्या निविदांची माहिती मुख्य अभियंता, औरंगाबाद यांनी सभेपुढे सादर करताना असे सांगितले की, या योजनेच्या कामाकरिता मागविण्यात आलेल्या निविदांपैकी मे.परफेक्ट इंजिनियरींग असोसिएट्स प्रा. लि., मुंबई यांची निविदा 3.50 टक्के म्हणजे रु. 14,63,50,814/— इतकी असून ती सर्वात कमी आहे. मे. परफेक्ट इंजि. असो., मुंबई ही एक नामांकित कंपनी असून या कंपनीची कामे मंडळात चालू आहेत. चालू असलेल्या कामाचा दर्जा लक्षात घेता व कामे करुन घेण्यासाठी कंपनीकडे असलेल्या सुविधा, कंपनीची आर्थिक परिस्थिती लक्षात घेता या कंपनीची दिलेली 3.50 टक्के कमी किंमतीची सर्वात कमी निविदा स्विकारण्याचा प्रस्ताव सभेपुढे सादर केला.

वरील बाबींवर सर्वंकषतेने विचार करुन सभेने सदर निविदा मान्य केली व खालीलप्रमाणे ठराव संमत केला.

असा ठराव करण्यांत येतो की, रु. 14,63,50,814/-- (चौदा कोटी त्रेसष्ट लाख पन्नास आठशे चौदा मात्र) किंमतीची मे. परमेश्वर इंजिनिअरींग असोसिएट्स प्रा. लि., मुंबई यांची कमीत कमी ची रिस्पॉन्सीव्ह व तांत्रिक दृष्ट्या योग्य असलेली निविदा स्विकारण्यास मान्यता देण्यांत येत आहे. या ची पुढील योग्य ती कार्यवाही करण्यास मंडळाच्या सदस्य सचिवांना प्राधिकृत करण्यांत येत आहे.

क्रम बाब क्र. 4, 5, 6 व 7 तसेच टेबल कार्यक्रम बाब क्र. 1, 2 व 3 वेळेअभावी ील सभेत ठेवण्याच्या सूचना अध्यक्षांनी दिल्या.

72/